(सोबत राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन अंतर्गत असलेल्या राज्य शिखर समितीच्या दिनांक ४.४.२००५ रोजी झालेल्या दुसऱ्या बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत)

**क्र.ग्रापापु १००४/प्र.क्र.९२/पापु.०७**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक- १२.४.२००५**

प्रति,

मा.मुख्य सचिवांचे वरीष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
मा.अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय,मुंबई.
मा.अप्पर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
मा.प्रधान सचिव, (ग्राम विकास), ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
मा.प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई
मा.सचिव (व्यय), वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई.
महासंचालक,माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय,मुंबई.
श्री. पोपटराव पवार, सरपंच, हिवरेबाजार, ता. जि. अहमदनगर.
श्री. मेंदीरस्ता, कार्यक्रम अधिकारी, युनिसेफ.
श्री. अजित कुमार, वॉटर ॲन्ड सॅनिटेशन प्रोग्राम (साऊथ एशिया)
श्री. मुर्ती, वॉटर ॲन्ड सॅनिटेशन प्रोग्राम (साऊथ एशिया)
उप सचिव (श्री. ठाकरे) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
उप सचिव (श्रीमती मोंडकर),नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रकल्प व्यवस्थापक (जलस्वराज्य), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.
राज्य समन्वयक, संवाद, क्षमता व विकास कक्ष, सिडको भवन, बेलापूर नवी मुंबई
कार्यासन पापु-१६, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती पापु.०७

**(सुधाकर ज्ञा.बोबडे)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

D:\BACKUP WS07\year 2005\c.r.92-1004 minutes of 4.4.05.doc

**विषय- "राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनच्या" शिखर समितीच्या सोमवार दिनांक ४ एप्रिल,२००५ रोजी झालेल्या दुसऱ्या बैठकीचे इतिवृत्त.**

केंद्र शासन पुरस्कृत स्वजलधारा योजना व संपूर्ण स्वच्छता अभियान यांचे राज्य स्तरावरील संचालन, निधी वितरण, मार्गदर्शन, सनियंत्रण या बाबींच्या अनुषंगाने अपेक्षीत कर्तव्ये व जबाबदारी पार पाडण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या राज्य स्तरावरील **"राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन"** च्या **"शिखर समिती"** ची दुसरी बैठक **सोमवार दिनांक ४ एप्रिल, २००५ रोजी दुपारी ४.३० वाजता** मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सदर बैठकीस उपस्थित असलेल्या सदस्यांची यादी **जोडपत्र-१** म्हणून सोबत जोडली आहे.

२. राज्य शिखर समितीचे मा.अध्यक्ष तथा मा.मुख्य सचिव यांचे व सर्व समिती सदस्यांचे स्वागत करुन बैठकीस सुरवात झाली व विषयसूचीनुसार प्रत्येक विषयांवर बैठकीत चर्चा होऊन पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले:-

**विषय क्रमांक १ :- राज्य शिखर समितीच्या दिनांक ९.६.२००४ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयांवरील कार्यवाहीचा आढावा :-**

दिनांक ९.६.२००४ च्या राज्य शिखर समितीच्या पहिल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयांवरील कार्यवाहीचा अहवाल **राज्य शिखर समितीच्या माहितीस्तव सादर करण्यात आला.**

**विषय क्रमांक २ :- राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनच्या शिखर समितीवर पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रातील संस्थांची/व्यक्तींची सदस्य म्हणून करण्यात आलेल्या नियुक्तीची माहिती सादर करणे.**

युनिसेफचे प्रतिनिधी, वॉटर ॲन्ड सॅनिटेशन प्रोग्राम (साऊथ एशिया) चे प्रतिनिधी व श्री.पोपटराव पवार यांची **राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनच्या शिखर समितीवर करण्यात आलेल्या नियुक्तीची माहिती समितीस देण्यात आली. या माहितीची समितीने नोंद घेतली.**

**विषय क्रमांक ३ :- राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनच्या कार्यकारी समितीवर विवि क्षेत्रातील तज्ञांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्याबाबत निर्णय घेणे.**

राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनच्या **"कार्यकारी समितीवर"** पुढील पदावरील व्यक्तींची/संस्थांच्या प्रतिनिधींची **नियुक्ती करण्यास समितीने मान्यता दिली.**

(अ) राज्यात राबविण्यात येत असलेल्या **जलस्वराज्य** प्रकल्पात पुढील पदांवर कार्यरत व्यक्ती:-

(१) संस्थीय व समाज विकास तज्ञ.

(२) आरोग्य व स्वच्छता तज्ञ.

(३) समाज विकास तज्ञ.

(४) माहिती, प्रचार व प्रसिध्दी तज्ञ.

(ब) संवाद व क्षमता विकास कक्षाचे **राज्य समन्वयक.**

(क) आकाशवाणी आणि दूरदर्शन केंद्राचे **केंद्र संचालक.**

(ड) स्वयंशिक्षण प्रयोग (SSP) या स्वयंसेवी संस्थेचा **प्रतिनिधी.**

**विषय क्रमांक ४ :- केंद्र शासन अर्थसहाय्यीत ग्रामीण पाणी पुरवठा व संपूर्ण स्वच्छता अभियान कार्यक्रमासाठीच्या राज्यस्तरीय संवाद क्षमता विकास कक्षासाठी निर्माण करावयाच्या पदांना मंजूरी देणे.**

स्वजलधारा व संपूर्ण स्वच्छता अभियानाच्या अंमलबजावणीसाठी राज्यस्तरावर राज्य मिशनच्या संनियंत्रणाखालील संवाद व क्षमता विकास कक्षासाठी (CCDU) निर्माण करण्यात आलेल्या ८ पदांची सर्व माहिती राज्य शिखर समितीस देण्यात आली. त्यापैकी राज्य समन्वयकाचे पद महाराष्ट्र विकास सेवेतील श्री.मल्लीनाथ कलशे यांच्या नियुक्तीने तर सल्लागारांची ३ पदे जिल्हा परिषद, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व खुल्या बाजारातून भरण्यात आल्याचे व इतर ४ पदे भरण्याची कार्यवाही **सुरु असल्याची माहितीही समितीस देण्यात आली. या सर्व पदांचा १००% खर्च पुढील ३ वर्ष केंद्र शासन देणार असल्याची माहिती समितीस देण्यात आली. या माहितीची समितीने नोंद घेतली.**

**विषय क्रमांक ५ :- स्वजलधारा योजनेसाठी केंद्र शासनासोबत करावयाच्या समझोता कराराच्या (MOU) प्रगतीबाबतचा आढावा सादर करणे.**

स्वजलधारा योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार स्वजलधारा I व II या दोन्ही योजनांसाठी केंद्र शासनाकडून निधी प्राप्त करुन घेण्यासाठी राज्य शासन व केंद्र शासन यांच्यामध्ये सामंजस्य करार करावयाचा आहे. हा करार करण्यासाठी काही बाबींची पूर्तता करुन घेणे आवश्यक आहे. त्यामध्ये क्षेत्र अभ्यास (Sector Study), ध्येय विधान (Vision Statement) व धोरणात्मक बदल करणे आवश्यक आहे. त्यापैकी क्षेत्र अभ्यास हा स्कॉट विल्सन यांच्याकडून करुन घेण्यात आला असून तो केंद्र शासनास सादर केल्याची माहिती समितीस देण्यात आली. ध्येय विधानाचा मसूदा शिखर समितीच्या मान्यतेसाठी सादर केल्याची माहिती समितीस देण्यात आली. धोरणात्मक बदल जे करणे आवश्यक होते, ते सर्व केल्याचे सांगण्यात आले त्यामुळे ध्येय विधानाच्या मसुद्यास शिखर समितीची मान्यता मिळाल्यास तो मंत्रिमंडळापुढे सादर करण्यात येईल असेही बैठकीत सांगण्यात आले त्यानुसार ध्येय विधानाच्या (Vision Statement) मसुद्यावर बैठकीत चर्चा होऊन **सदर मसूदा मंत्रिमंडळापुढे मंजूरीसाठी सादर करण्यास समितीने मान्यता दिली.**

**विषय क्रमांक ६ :- केंद्र शासनाच्या स्वजलधारा व संपूर्ण स्वच्छता अभियान कार्यक्रमांतर्गत आर्थिक व भौतिक प्रगतीचा आढावा.**

स्वजलधारा व संपूर्ण स्वच्छता अभियानाच्या अंमलबजावणीचा आढावा समितीमध्ये घेण्यात आला. त्यावेळी मा.अध्यक्षांनी अशी सूचना केली की या दोनही योजनांसाठी केंद्र शासनाकडून प्राप्त होणारा निधी हा परस्पर कार्यान्वयन यंत्रणेकडे (जिल्हा परिषदेकडे) जात आहे. परंतु, त्याची नोंद राज्याच्या नियोजन अथवा वित्त विभागात कोठेही होत नसल्याने याची राज्याच्या नियोजन व वित्त विभागात नोंद कशा प्रकारे घेतली जाईल/घेता येईल याची तपासणी करुन प्रस्ताव सादर करण्यात यावा.

**विषय क्रमांक ७ :- संपूर्ण स्वच्छता अभियानांतर्गत वैयक्तिक शौचालय बांधण्यास प्रवृत्त केल्याबद्दल अंगणवाडी कार्यकर्ती, ग्रामसेवक, आरोग्य कर्मचारी यांना मानधन देण्याबाबत.**

अंगणवाडी कार्यकर्ती/कार्यकर्ता, मदतनीस, ग्रामसेवक, शिक्षक, गाव पातळीवरील इतर जिल्हा परिषद/शासकीय कर्मचारी, एन.एस.एस.चे स्वयंसेवक, निरंतर शिक्षणाचे प्रेरक इत्यादि व्यक्तींनी आपली सर्व नियमित कामे/जबाबदारी सांभाळून **संपूर्ण स्वच्छता अभियानात** वैयक्तिक शौचालय बांधून घेण्यासाठी गावातील एखाद्या कुटुंबास प्रेरणा दिल्याबद्दल त्या व्यक्तीस रु.५०/- प्रति कुटुंब असे मानधन सदर गाव

निर्मलग्राम पुरस्कारासाठी जिल्ह्याने राज्य शासनाकडे शिफारस करुन पाठविल् देण्यास मान्यता देण्यात आली. त्याच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीची व्यवस् ठरविण्यासाठी मा.प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखालील कार्यकारी समितीस अधिकार प्रदान करण्यात आले.

विषय क्रमांक ८ :- **मा.अध्यक्षांच्या परवानगीने येणारे इतर विषय :-**

मा.अध्यक्षांच्या अनुमतीने पुढील दोन विषय बैठकीत मांडण्यात आले व त्यावर पुढीलप्रमाणे निर्णय झाला :-

(१) **राज्यस्तरावर राज्य मिशनचे लेखापरिक्षण करण्यासाठी सनदी लेखापालांची नियुक्ती करण्याबाबत..**

स्वजलधारा व संपूर्ण स्वच्छता अभियान या योजनांसाठी राज्यस्तरावर प्राप्त होणाऱ्या निधीमधून राज्य व जिल्हा स्तरावर खर्चाचे लेखापरिक्षण करण्यासाठी सनदी लेखापालांमधून योग्य व पारदर्शक पध्दत अवलंबून सनदी लेखापालाची नियुक्ती करण्याचे अधिकार **राज्य कार्यकारी समितीस प्रदान करण्यात आले.**

(२) **संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानात यशवंत ग्राम दर्जा मिळालेल्या ग्रामपंचायतींना केंद्र पुरस्कृत संपूर्ण स्वच्छता कार्यक्रमांतर्गत इतर ग्रामपंचायतीसाठी करावयाच्या प्रचार/प्रसिध्दी क्षमता बांधणीच्या कामात सामावून घेण्याबाबत**

(अ) **"यशवंत ग्राम"** गावांना इतर कोणत्याही गावाने, गाव पाहण्यासाठी भेट दिल्यानंतर त्यावेळी त्या **"यशवंत ग्राम"** गावास कराव्या लागणाऱ्या खर्चासाठी **प्रती गाव रु.२००/- पर्यंत** मोबदला देण्यास समितीने मान्यता दिली. परंतु, अशा प्रकारे एका गावास **रु.एक लक्षपेक्षा** अधिक मोबदला देता येणार नाही असे बंधन घालण्यात आले.

(ब) तसेच, **"यशवंत ग्राम"** गावास इतर गावांना मार्गदर्शन करण्यासाठी /प्रबोधनासाठी काही गावांना भेटी द्यावयाच्या झाल्यास अशा गावच्या एका भेटीसाठी **रु.२०००/- (रुपये दोन हजार फक्त)** एवढा मोबदला देण्यास समितीने मान्यता दिली. परंतु, अशाप्रकारे एका **"यशवंत ग्राम"** गावास रु.२.०० लक्षपेक्षा अधिक मोबदला देता येणार नाही असेही बंधन घालण्यात आले.

मा.अध्यक्षांचे व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपली.

राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनमधील शिखर समितीच्या सोमवार दिनांक ४ एप्रिल, २००५ रोजी मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीतील कार्यवाहीचे मुद्दे:-

| अ. क्र. | बैठकीत घेतलेले निर्णय | निर्णयाची अंमलबजावणी करणारी यंत्रणा/अधिकारी | अंमलबजावणी पूर्ण करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनच्या **"कार्यकारी समितीवर"** पुढील पदावरील व्यक्तींची/संस्थांच्या प्रतिनिधींची **नियुक्ती करण्यास समितीने मान्यता दिली.**<br>(अ) राज्यात राबविण्यात येत असलेल्या **जलस्वराज्य** प्रकल्पात पुढील पदांवर कार्यरत व्यक्ती:-<br>१) संस्थीय व समाज विकास तज्ञ.<br>२) आरोग्य व स्वच्छता तज्ञ.<br>३) समाज विकास तज्ञ.<br>४) माहिती, प्रचार व प्रसिध्दी तज्ञ.<br>(ब) संवाद व क्षमता विकास कक्षाचे **राज्य समन्वयक.**<br>(क) **आकाशवाणी आणि दूरदर्शन केंद्राचे** केंद्र संचालक.<br>(ड) स्वयंशिक्षण प्रयोग (SSP) या स्वयंसेवी संस्थेचा **प्रतिनिधी.** | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग कार्यासन-पापु०७ | १५ मे, २००५ |
| २ | ध्येय विधानाचा (Vision Statement) **मसूदा मंत्रिमंडळापुढे मंजूरीसाठी सादर करण्यास समितीने मान्यता दिली.** | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग कार्यासन-पापु-०७ | १५ मे, २००५ |

| अ. क्र. | बैठकीत घेतलेले निर्णय | निर्णयाची अंमलबजावणी करणारी यंत्रणा/अधिकारी | अंमलबजावणी पूर्ण करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| ३ | स्वजलधारा व संपूर्ण स्वच्छता अभियान या योजनांसाठी केंद्र शासनाकडून प्राप्त होणारा निधी हा परस्पर कार्यान्वयन यंत्रणेकडे (जिल्हा परिषदेकडे) जात आहे. परंतु, त्याची नोंद राज्याच्या नियोजन अथवा वित्त विभागात कोठेही होत नसल्याने याची राज्याच्या नियोजन व वित्त विभागात नोंद कशा प्रकारे घेतली जाईल / घेता येईल याची तपासणी करुन प्रस्ताव सादर करण्यात यावा. | नियोजन विभाग व वित्त विभाग | ३० मे, २००५ |
| ४ | अंगणवाडी कार्यकर्ती /कार्यकर्ता, मदतनीस, ग्रामसेवक, शिक्षक, गाव पातळीवरील इतर जिल्हा परिषद/शासकीय कर्मचारी, एन.एस.एस.चे स्वयंसेवक, निरंतर शिक्षणाचे प्रेरक इत्यादि व्यक्तींनी आपली सर्व नियमित कामे / जबाबदारी सांभाळून **संपूर्ण स्वच्छता अभियानात** वैयक्तिक शौचालय बांधून घेण्यासाठी गावातील एखाद्या कुटुंबास प्रेरणा दिल्याबद्दल त्या व्यक्तीस **रु.५०/- प्रति कुटुंब** असे मानधन, सदर गाव निर्मलग्राम पुरस्कारासाठी जिल्ह्याने राज्य शासनाकडे शिफारस करुन पाठविल्यावर देण्यास मान्यता देण्यात आली. त्याच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीची व्यवस्था ठरविण्यासाठी मा.प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखालील कार्यकारी समितीस अधिकार प्रदान करण्यात आले. | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग कार्यासन-पापु-१६ | १५ मे, २००५ |

| अ. क्र. | बैठकीत घेतलेले निर्णय | निर्णयाची अंमलबजावणी करणारी यंत्रणा/अधिकारी | अंमलबजावणी पूर्ण करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| ५ | स्वजलधारा व संपूर्ण स्वच्छता अभियान या योजनांसाठी राज्यस्तरावर प्राप्त होणाऱ्या निधीमधून राज्य व जिल्हा स्तरावर खर्चाचे लेखापरिक्षण करण्यासाठी सनदी लेखापालांमधून योग्य व पारदर्शक पध्दत अवलंबून सनदी लेखापालाची नियुक्ती करण्याचे अधिकार **राज्य कार्यकारी समितीस प्रदान करण्यात आले.** | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग कार्यासन-पापु-०७ | १५ मे, २००५ |
| ६ | **"यशवंत ग्राम"** गावांना इतर कोणत्याही गावाने, गाव पाहण्यासाठी भेट दिल्यानंतर त्यावेळी त्या **"यशवंत ग्राम"** गावास कराव्या लागणाऱ्या खर्चासाठी **प्रती गाव रु.२००/- पर्यंत** मोबदला देण्यास समितीने मान्यता दिली. परंतु, अशा प्रकारे एका गावास **रु.एक लक्षपेक्षा** अधिक मोबदला देता येणार नाही असे बंधन घालण्यात आले. | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग कार्यासन पापु-१६ | १५ मे, २००५ |
| ७ | **"यशवंत ग्राम"** गावास इतर गावांना मार्गदर्शन करण्यासाठी /प्रबोधनासाठी काही गावांना भेटी द्यावयाच्या झाल्यास अशा गावच्या एका भेटीसाठी **रु.२०००/- (रुपये दोन हजार फक्त)** एवढा मोबदला, देण्यास समितीने मान्यता दिली. परंतु, अशाप्रकारे एका **"यशवंत ग्राम"** गावास रु.२.०० लक्षपेक्षा अधिक मोबदला देता येणार नाही असेही बंधन घालण्यात आले. | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग कार्यासन पापु-१६ | १५ मे, २००५ |